## प्रेसनोट दि.११/०३/२०२०

### मदय प्राशन करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांवर करण्यात आलेल्या विशेष कारवाई

### पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखा व पो.स्टे. कडील कारवाई

सध्या पिंपरी चिंचवड आयुक्तालयात अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे दिसुन येत आहे. विशेष सण किंवा उत्सवाच्या वेळी बरेच वाहनचालक मदय प्राशन करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करतात. त्यामुळे अपघात होऊन लोकांच्या जिवीताचे नुकसान होत असते. अशा वाहनचालकांवर वचक बसावा याकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील वाहतुक शाखा व पोलीस स्टेशन कडुन धुलिवंदन सणाच्या पार्श्वभुमीवर दिनांक १०/०३/२०२० रोजी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| अ.क्र | शिर्षक | एकुण केसेस | एकुण दंड |
|---|---|---|---|
| १. | डी. डी. कारवाई | ९५ | कोर्ट |

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यापुढे देखील मदय प्राशन करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणारे वाहनचालक निदर्शनास आल्यास त्यांचेवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. जेणेकरुन होणारे अपघात नियंत्रणात आणता येतील व जिवीतहानी टाळता येईल. वाहतुक शाखा व पोलीस स्टेशनकडुन सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळावेत.

पोलीस निरीक्षक,नियोजन
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner